# 'मराठी लेखनकलेसाठी संवाद तंत्रज्ञान लांबच'

## तज्ज्ञांचे मत : 'इंडिया-भारत' दरी कमी होण्याची गरज

**सकाळ वृत्तसेवा**

महाकवी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर साहित्यनगरी (ठाणे), ता. २७ : टांक, लेखणी जाऊन आलेल्या संगणकाच्या कळफलकाचा मराठी लेखनकलेवर काय परिणाम होईल, याचा विचार करण्यासाठी जमलेल्या तज्ज्ञांनी हा प्रश्न भावी पिढीच्या हाती सोपवून दिला आहे. आपल्या पुढील पिढ्याच मराठी लेखनकलेची स्वतःच्या पद्धतीने जपणूक करतील, असा सूर एका परिसंवादातील तज्ज्ञांनी मांडला.

समीरण वाळवेकर यांनी आभासी विद्यापीठाची संकल्पना मांडून संवाद तंत्रज्ञान कला प्रत्येकाने आत्मसात केली पाहिजे, असे सांगितले; पण यमाजी मालकर यांनी त्यावर आक्षेप घेतला. "७० टक्के जनता अजून या तंत्रापासून लांबच आहे, राज्यात अनेक ठिकाणी १० तास वीज नसते, प्राथमिक शिक्षण अजून अनेक मुलांपर्यंत पोचले नाही,' अशी संगणकाच्या कळफलकाची कमकुवत बाजू त्यांनी मांडली.

संवादासाठी शास्त्रशुद्ध मराठीची गरज नाही, तर तंत्रज्ञानाचा वापर मुले कसा करतात आणि ती आपल्यापेक्षाही संवादात कशी पुढे गेली आहेत, हे राजीव तांबे यांनी सांगितले. मंदार जोगळेकर यांनी ई-बुकचे प्रात्यक्षिक दाखवून लेखक, प्रकाशन व वाचक यांच्यातील दरी कशी कमी करता येईल याचे विवेचन केले. आधुनिक असा 'इंडिया' आणि अद्याप मागासलेला 'भारत' यांच्यातील दरी कमी झाली तरच हे शक्य आहे आणि मुले जर संगणकीय तंत्रामुळे निष्क्रिय आणि करमणूकप्रधान झाली तर मोठा धोका आहे, असा इशारा निरंजन घाटे यांनी या वेळी दिला.